International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# गोपाळ गणेश आगरकरांचे सामाजिक सुधारणेसाठी कायद्याच्या आवश्यकतेविषयी विचार

**डॉ. सुरेश नामदेव दांडगे**

*सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग, आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कासेगाव, जि. सांगली.*

*Corresponding Author - डॉ. सुरेश नामदेव दांडगे*

DOI - 10.5281/zenodo.10873032

**गोषवारा :**

*19 व्या शतकात सर्वत्र उच्चनिच भेदभाव, अज्ञान, गुलामगिरी, दारिद्रय, अंधश्रध्दा, जातिभेद, गुलामगिरी, अशा समाज विघातक अनिष्ट रूढी परंपरांच्या प्राबल्यामुळे समाजाची अधोगती झाली होती. पाश्चात्य शिक्षणाने प्रबोधित झालेल्या आगरकरांनी समाजातील ही विषमता व अनिष्ट चालीरिती नष्ट करण्यासाठी पुढाकार घेतला. समाज जीवन चैतन्यमय करणे, नवजागृती आणी आधुनिक जीवनमूल्य रूजण्यासाठी त्यांनी कायद्याच्या आवश्यकतेविषयी वैचारिक प्रबोधन केले. भारतीय समाज व्यवस्थेत दृढमूल झालेली जातीसंस्था, अस्पृश्यता, ग्रंथप्रामाण्य, कर्मकांड आणि धार्मिक रूढी परंपरामुळे समाजाची अपरिमित हानी झाली होती. तसेच स्त्रीदास्य, बालविवाह, सतीप्रथा, केशवपन, अशा स्त्रीविषयक अनिष्ट रूढीपरंपरांनी गांजलेल्यांना कायदेविषयक निर्बंधाशिवाय पर्याय नव्हता.*

*विवेकवाद आणि बुध्दिप्रामाण्यवादी आगरकरांनी लोकांवर सुसंस्कार करण्यासाठी 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार' अशा परखड शब्दात निश्चय वर्तविला होता. आगरकरांनी समाजातील दुर्बल, भेकड, स्वार्थी बनलेल्या लोकांत परिवर्तन करण्यासाठी आत्मविश्वासाने कायद्याच्या आवश्यकतेचा विचार मांडला. आगरकरांवर झालेल्या लिखाणात व संशोधनात त्यांनी मांडलेल्या कायद्याच्या आवश्यकतेच्या पैलूवर संशोधन झालेले दिसत नाही. म्हणून "गोपाळ गणेश आगरकरांचे सामाजिक सुधारणेसाठी कायद्याच्या आवश्यकतेविषयी विचार" या विषयाची मांडणी केली आहे.*

***Keywords:* भेदभाव, अज्ञान, गुलामगिरी, दारिद्रय, अंधश्रध्दा, जातिभेद, गुलामगिरी**

**प्रस्तावना :**

गोपाळ गणेश आगरकरांचा जन्म सन 14 जुलै 1856 रोजी कराडजवळील टेंभू येथे झाला असून त्यांना सन 1895 पर्यंत केवळ 39 वर्षाचे आयुष्य लाभले होते. त्यांच्यांवर जॉन स्टुअर्ट मिल, हर्बर्ट स्पेन्सर आणि ऑगस्ट कॉम्ट या विचारवंतांच्या उदारमतवाद, बुद्धिप्रामाण्यवाद व विवेकवादाचा प्रभाव पडला होता. त्यामुळे आगरकरांच्या सामाजिक सुधारणेच्या विचाराच्या मूळाशी बुद्धिप्रामाण्यवाद, उदारमतवाद, मानवतावाद आणि विवेकवाद ही तत्वे रूजली होती. समकालीन विविध समाज सुधारकांपेक्षा

त्यांचे विचार वेगळे व समाज हिताचेच होते. समाजाची बौद्धिकदृष्ट्या अधोगती होऊन त्यांची शारीरिक, मानसिकदृष्ट्या दयनिय अवस्था झाली होती. म्हणूनच आगरकरांनी नवसमाजाच्या निर्मितीसाठी प्रचलित कायद्याचा अवलंब करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- 19 व्या शतकात रूढी-परंपरामुळे समाजाची अधोगती झाली होती.
- आगरकरांची विवेकवादी विज्ञाननिष्ट भूमिका मांडणे.
- समतेचा अवलंब करून समाजातील विषमता नाहीशी करणे.
- आगरकरांचे स्त्री-पुरूष समानतेचे कार्य मांडणे.
- अनिष्ट रूढी-परंपरा कायद्याव्दारे नाहीशा करण्यासाठी प्रबोधन करणे.

**संशोधन विषयाची निवड :**

ब्रिटिशांच्या आधुनिक शासन प्रणालीमूळे सर्वत्र परिवर्तनास सुरूवात झाली होती. आधुनिक व पाश्चात्य पध्दतीचे शिक्षण घेतलेल्या सुधारक आगरकरांनी समाज जीवनात अमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी आयुष्यभर वैचारिक प्रबोधन केले होते. पाश्चात्य देशातील समाजाचा झालेला भौतिक विकास, त्यांना मिळालेलं स्वातंत्र्य, जगातील मानवता आणि समता इत्यांदी नवमूल्ये आगरकरांच्या विचारामुळे लोकांत रूजली होती. सामाजिक सुधारणेसाठी कायद्याच्या आवश्यकतेचा जो विचार आगरकरांनी प्रतिपादन केला. त्या कायदेविषयक विचाराचा सखोल आणि सर्वव्यापक अभ्यास करण्यासाठी आणि ज्ञानामध्ये भर घालण्यासाठी "गोपाळ गणेश आगरकरांचे सामाजिक सुधारणेसाठी कायद्याच्या आवश्यकतेविषयी विचार" हा संशोधन विषय निवडलेला आहे.

**सामाजिक सुधारणेसाठी कायद्याच्या आवश्यकतेविषयी विचार :**

सामाजिक सुधारणा कायद्याच्या कक्षेत राहून कराव्या अशी आगरकरांची परखड भूमिका होती. त्यासाठी समाज जीवनात रूढ झालेल्या अन्याय्यकारक रूढी-परंपरांचे समाज जीवनावर होणारे दुश्परिणाम टाळण्यासाठी रूढी-परंपरांच्या श्रंखलावर सतत कायद्याचे घाव घालून त्या समूळ नष्ट करणे समाज हिताचे आहे. समाजाचे नुकसान टाळण्यासाठी ''लोकांना तापदायक गोष्टीपासून परावृत्त करण्यासाठी काही प्रतिबंधक उपाय योजणे क्रमप्राप्त ठरते.''[1] या काही प्रतिबंधक उपायानुसार कायद्याचा मार्ग अनुसरणे होय. रूढीप्रिय आणि गतिशुन्य समाजात बदल घडवून आणण्यासाठी सरकारच्या कायद्याचा दीर्घकाळ अवलंब करणे उपयोगी ठरेल अशी आगरकरांना खात्री होती. थोडक्यात कायद्याचे समाजावर दडपण असल्याशिवाय समाजबदलाची प्रक्रिया गतिमान होणार नाही.

भारतीय परंपरेनुसार व्यक्तीचा आणि समाजाचा कुटुंब हा मुख्य घटक राहिलेला असून व्यक्तीच्या योग्यअयोग्य वागणूकीचा परिणाम कुटुंबावरच होत असतो. 19 व्या शतकात समाजातील विविध जातींची स्थिती वेगवेगळया स्वरूपाची होती. ‘‘कायद्याच्या द्रष्टीने सर्व जाती व व्यक्ती सारख्याच आहेत. व्यक्तीच्या प्रत्येक कृतीला संपूर्णपणे ती स्वतःच जबाबदार आहे. नागरिकांच्या कर्तव्याइतकेच त्यांचे हक्कही महत्वाचे असून ते अबाधित राखणे हे शासनसंस्थेचे मुख्य काम आहे.’’[2] इंग्लडमध्ये सर्व व्यक्ती आणि सर्वच जाती या कायद्यासमोर समान असल्याने, कायद्यानुसार प्रत्येक व्यक्तीच्या चांगल्या-वाईट वागणूकीस ती स्वतः जबाबदार आहे. असे कायद्यानुसार समतेचे तत्व सुधारणावादी आगरकरांना योग्य वाटल्याने त्यांनी ब्रिटिशांच्या प्रचलित कायद्याचे अनुकरण केले. ‘‘आगरकरांच्या समाज सुधारणेला तत्कालिन सनातन्यांचा कडवा विरोध होता.’’[3] हा विरोध परखडपणे झुगारून समाजातील वर्षानुवर्षापासून चालत आलेल्या अनिष्ट चालीरीती रूढी-परंपरा नष्ट करण्यासाठी कोणत्या प्रचलित मार्गाचा अवलंब केल्याने समाजहिताचे होईल. याबाबत ‘सामाजिक सुधारणा आणि कायदा’ या लेखामध्ये आपले कायदेविषयक विचार व्यक्त करताना आगरकरांनी, ‘‘सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी कायदा करावयास विरोध करनाऱ्या स्वतःस ज्ञानविशिष्ट म्हणविनाऱ्या लोकांवर त्यांनी तीव्र टीका केली आहे.’’[4] म्हणजेच समाजात दुही निर्माण करणा-या लोकांविषयी आगरकरांनी संताप व्यक्त केला होता.

समाजातील लोकांत मठ्ठपणा असल्यामुळे सरकारला कायद्याचा सक्तीने अंमल करता येईल परंतु सनातनी लोकांचा अशा बदलास नेहमीच विरोध होता. याविशयी आगरकर म्हणतात, ‘‘सरकारने कोणत्याही कामात, विशेषतः धार्मिक व सामाजिक कामांत पडू नये अशी तुमची इच्छा असेल, तर देशोन्नतीच्या ज्या गोष्टींविषयी ज्ञात्यांस शंका राहिलेली नाही अशा गोष्टी आपण होऊन करून लागा.’’[5] असे केल्याने ब्रिटिश लोकांना भारतीयाच्या समाजात ढवळाढवळ करण्याची संधी सापडणार नाही, असे कायद्याचे कट्टर समर्थक आगरकरांचे मत होते.

समाजातील सर्वं लोकांना समान पध्दतीचे हक्क आणि समान पध्दतीची संधी जरी मिळाली, तरी समाजातील व्यक्तीव्यक्तीत आणि स्त्रीपुरुषांतील नैसर्गिक भिन्नता टिकून राहिल. सर्वच लोकांची बुध्दीमत्ता एकसारखी चंचल होऊन पडेल ती कामगिरी तडीस नेण्याची खात्री नाही, परंतु समाजमनात भिनलेला पारपांरिकभेद व विषमता नष्ट होईल. असा आशावाद आगरकरांनी प्रतिपादन केला असून ते म्हणतात, ‘‘प्रस्तुत काली निरनिराळया वर्गातील लोकांत व स्त्रीपुरूषात जे विलक्षण अंतर द्रष्टीस पडत आहे, ते पुश्कळच संकुचित करता येणार आहे.’’[6]

मध्ययुगीन मुघल काळात स्त्रियांची आरोग्य विषयक स्थिती सुधारण्याची आवश्यकता वाटल्याने, ‘‘नहाण आल्याशिवाय मुलींची लग्ने करू नयेत असा अकबर बादशहाने कायदा’’[7] करून बालविवाहावर निर्बंध घातला होता. तसेच

समाजातील स्त्रियासंबंधी अस्तित्वात असलेल्या अमानुष आणि अनैसर्गिक रूढी परंपरा बंद करण्यासाठी कायद्याचा आधार घेतला होता. त्यानुसार ''अकबर बादशहाने सतीची चाल बंद करण्यास कायद्याचा वापर केला व साऱ्या लोकांनी चट्टदिशी, मुकाटयाने मान्य केले.''[8] तत्कालीन मुघल सत्ताधिश अकबर बादशहाने अनिष्ट चालीविरोधी कायद्याचा उपयोग केला होता. त्यानुसार सद्यस्थितीतील सरकारनेसुध्दा कायद्याचा उपयोग करून अनैसर्गिक रूढी परंपरा नष्ट कराव्या असे आगरकरांचे मत होते.

समाजातील अनिष्ट प्रथा-परंपरा दूर करण्यासाठी सरकारच्या कायद्याची मदत घेणे म्हणजे सामाजिक व्यवस्थेत सरकारला हस्तक्षेप करण्यास वाव देणे असे सुधारणांना विरोध करणाऱ्या प्रतिगामी लोकांचे मत होते. ''ज्या हक्कासाठी व स्वातंत्र्यासाठी हे लोक आक्रोश करीत होते, तो हक्क कसला? तर पोटच्या पोरीचे कुंकू पुसून तिला विद्रूप करण्याचा.''[9] अप्रत्यक्षपणे समाजविघातक कुप्रथा समाजामध्ये टिकून राहण्यासाठीच हे सनातनी लोक समाज सुधारणांना विरोध करीत होते. म्हणून समाजातील सनातनी प्रवृत्तीचे निगरगठ्ठ लोक रूढीप्रिय असून सुधारणा करताना त्यांचे समर्थन मिळत नाही. ''हजारो अबलांना, कोवळया कुमारिकांना पतीच्या दुष्ट वासनांना बळी पडावे लागत आहे.''[10] पुरूषाच्या अमानुश व दुष्ट कृत्यास प्रतिबंध घालण्यासाठी जबरदस्तीने प्रतिबंधक कायद्याचा सरकारने अंमल करून कायद्यानेच बालविवाहावर मर्यादा घातल्यास समाज गतिमान होईल. अशी आगरकरांना कायद्याबाबत अपेक्षा होती.

आगरकरांवर प्रभाव असणाऱ्या जॉन स्टुअर्ट मिल्ल यांच्या मते, आपल्या अंगी असणाऱ्या दुर्गुणांना काढून टाकण्यासाठी कोणताही व्यक्ती अनुकूल असत नाही. ''अडाणी लोकांस जबरीच्या शिक्षणाचा, वस्ताद दारू पिणारास दारू पिण्याच्या बंदीचा, अल्पवयांतच त्यांच्या संमतीविरूध्द संभोग करणारांस संमतीचे वय वाढविण्याचा कायदा सहसा पसंत पडावयाचा नाही!''[11] सुधारणेसाठी सरकारने केलेल्या कायद्याचा अवलंब न करता त्या प्रचलित कायद्याचा निषेध करणे, म्हणजे आपल्या समाजास सुधारणेची गरज नाही असेच समजणे होय. याविषयी आगरकर म्हणतात की, ''आमच्या समाज व्यवस्थेत ढवळाढवळ करण्यास सरकारने मनात आणले तर ते आज असमर्थ आहे असे तरी मनात येईल का? आणि सती जाण्याची चाल जी सरकारने बंद केली त्यापासून धर्मातही प्रसंगानुसार हात घालण्यास सरकार डगमगणारे नाही असे सिध्द झाले नाही काय?''[12] समाजातील प्रचलित असलेल्या रूढी-परंपरा नाहीशा करण्यासाठी कायद्याचे सहाय्य घेणे क्रमप्राप्त आहे. सर्व स्तरातील सुधारणा कायद्याच्या आधारे कराव्या असे त्यांना अभिप्रेत नव्हते. परंतु विधवा झालेल्या स्त्रियांच्या केशवपनाचा पुरस्कार करणाऱ्या सनातनी सामाजिक शक्तीस प्रचलित कायद्याने आळा घालून ही प्रथा समाजातून समूळ नष्ट करावी. असे आगरकरांचे परखड व ठाम मत होते.

समाजात सर्रासपणे होणाऱ्या बालविवाहास कायद्याने प्रतिबंध करण्याचा विचार आगरकरांनी अत्यंत तळमळीने मांडून, या अन्यायकारक प्रथेस कायद्याने प्रतिबंध करण्यासाठी संमती वयाच्या कायद्याचा त्यांनी पुरस्कार केला. परकीय इंग्रज सरकारच्या कायद्याने आमच्या धर्मशास्त्रात हस्तक्षेप होईल, असे समजणारे धर्माभिमानी व सनातनी लोक प्रत्यक्षात या दुष्ट रूढीचा पुरस्कार करीत होते. सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी समाज शिक्षणाची निकड असली तरी त्यांना कायद्याचा मार्ग अभिप्रेत होता. म्हणून ''संमती वयाच्या कायद्यामुळे हिंदुधर्मात परकीयांचा हस्तक्षेप होतो ही कल्पना त्यांना मुळीच मान्य नव्हती. थोडक्यात पतीच्या चितेवर सती जाण्याची चाल कायद्यानेच बंद करावी लागली. तशीच बालविवाहाची पध्दत ही कायद्यानेच बंद''[13] करणे आवश्यक आहे, असे आगरकरांचे ठाम मत होते.

ब्रिटिशांचा परकीयपणा लक्षात न घेता भारतीयांच्या हितासाठी कायद्याचा विचार करावा असे त्यांचे मत होते. समाजातील ''स्त्रिया ऋतुस्नात झाल्यावर जरी त्यांचे विवाह होऊ लागले तरी ज्याला असले कर्म करावयाचे असेल त्याच्या तावडीत कोणी तरी मुलगी सापडेलच.''[14] अशा परिस्थितीत प्रचलित कायद्याचा स्त्रियांना कोणताही उपयोग होणार नाही, असे कायदा विरोधकांचे मत असले तरी प्रत्यक्षात ब्रिटिश सरकारने ''सतीबंदी, विधवाविवाहास मान्यता, संमतीवय, धर्मांतरिताचा आपल्या वडिलार्जित संपत्तीवरील हक्क यासंबंधी जेव्हा त्यांनी कायदे मंजूर केले, तेव्हाच त्यांनी आपल्या धार्मिक व सामाजिक व्यवहारात हात घातला,''[15] असा कायद्याबाबत आगरकरांचा निश्चय होता. ''राज्यकर्त्यांच्या कायद्याचे भय किती बाळगावे याबद्दल त्यांच्या मनात संशय नव्हता. राज्यातील कायदे जोवर हिताचे असतील तोवर त्यांचा अंमल चालू द्यावा. अहिताचे दिसल्यास त्याचाही निशेध करावा.''[16] अशी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत आगरकरांची धारणा होती.

ज्ञानप्रसाराच्या माध्यमातून समाजप्रबोधन करताना ज्यांचे हितसंबंध पारंपारिक सनातन व्यवस्थेत अडकले आहे, अशा सनातनी विरोधकांचा विरोध कायद्याच्या समर्थनातून झुगारून दिल्याने आगरकरांच्या विचाराचा विजय निश्चित झाला. समाजातील लोकांच्या आचरणांत परिवर्तन घडवून आणण्यासाठी आगरकरांनी आयुष्यभर खटपट केली, शिक्षण घेऊन सुशिक्षित झालेल्या लोकांनी समाजाच्या सुधारणेसाठी विरोध न करता कायद्याचा स्वीकार करावा. लोकांच्या राहणीमानात परिवर्तन होण्यासाठी अशा सुधारणा कायद्यानेच बंधनकारक कराव्या असे आगरकरांचे मत होते.

**प्रस्तूत संशोधनाचा वेगळेपणा :**

भारतीय समाजाची परिस्थिती सुधारण्यासाठी आगरकरांचे अंतःकरण तळमळत होते. अशिक्षिताप्रमाणेच उदासिन बनलेल्या सुशिक्षितांना समाज सुधारणेच्या माध्यमातून खडबडून जागे केले. त्यांनी परंपरानिष्ट बनलेल्या लोकांना रूढीप्रियतेच्या खड्डयातून बाहेर

काढण्याचा प्रयत्न केला. आगरकरही राष्ट्रवादी आणि स्वातंत्र्यवादी असून त्यांच्या अंतःकरणात समाजाप्रती दया आणि करूणा होती. बालविधवा, केशवपन, सतीची चाल, अस्पृश्यता, जातीभेद, उपेक्षित भोळया-भाबडया स्त्रिया आणि दलितांना सोसावा लागणारा जुलूम, करावे लागलेले काबाडकष्ट यामुळे आगरकरांना संताप येत होता. आगरकर हे कमालीचे बुध्दिप्रामण्यवादी आणि प्रखर बुध्दिवादी होते. हे यावरून स्पष्ट होते. आगरकरांच्या जीवन चरित्राचे चिकित्सक पध्दतीने लेखन करताना त्यांनी आपल्या 39 वर्षाच्या सार्वजनिक आयुष्यात न्यू इंग्लिष स्कूलचे शिक्षक म्हणून 7 वर्षे, केसरी वृत्तपत्राचे संपादक म्हणून 7 वर्षे आणि सुधारक या वृत्तपत्राचे संपादक म्हणून 7 वर्षे समाजाचे वेगवेगळया स्तरावर प्रबोधन करून समाजातील दुष्ट अमानुष रूढी नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

**निष्कर्ष :**

19 व्या शतकात महाराष्ट्रासह भारतातील लोक सामाजिक अनिष्ट चालीरिती आणि रूढीपरंपरामध्ये गुरफटले होते. समाजातील सर्व लोकांची विभागणी चातुवण्र्य चातुर्वर्ण्य व्यवस्थेत झाली असुन समाज विविध जातीत विभागला गेला होता. अशा परिस्थितीत गोपाळ गणेश आगरकरांनी लोकांच्या मनात भिनलेल्या रूढी परंपरा नाहीशा करण्याचा शिक्षण व प्रबोधनाच्या माध्यमातून आटोकाट प्रयत्न केला होता. आपल्या सार्वजनिक जीवनात समाजसुधारणेचे व्रत घेतलेल्या आगरकरांनी समाजातील विविध जातींतील रूढिग्रस्त लोकांच्या मनावर टीकेचा घाव घालून सुधारणावादी विचार बिंबविले होते. त्यांच्या समाज सुधारणेसाठी कायदेविषयक प्रबोधनामुळे भारतीयांच्या मनामनात भिनलेली जातीय व्यवस्था, स्पृष्य-अस्पृश्यता, ग्रंथप्रामाण्यता, धार्मिक कर्मकांड आणि रूढी परंपराचे प्राबल्य नाहिसे होताना दिसत आहे.

समाजातील अनिष्ट रूढीपरंपरांनी गांजलेल्यांना कायदेविषयक प्रबोधनाने बालविवाह, स्त्रीदास्यत्व, सतीप्रथा आणि केशवपन यासारख्या जाचक प्रथा समाजातून समूळ नष्ट होऊन समाजाची होणारी अपरिमित हानी टाळता आलेली आहे. लोकांनी आपल्या बौध्दिक, शारीरिक आणि मानसिक द्रष्टीकोणात बदल करून नवसमाजाच्या निर्मितीचे पुढचे पाऊल टाकले आहे. देशात अस्तित्वात असलेल्या कायद्याची समाजहितासाठी दुरूस्ती सुचवून आगरकर थांबलेले नाहीत, तर त्यांचा ‘इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार’ असा परखड बाणा, बुध्दिप्रामाण्य आणि विवेकवादाच्या आधारे पुढील पिढी सुसंस्कारीत होण्यास मोलाची मदत झाली होती. त्यामुळेच समाजातील दुर्बलता, भेकडपणा आणि स्वार्थीपणा कमी होऊन परिवर्तनास योग्य दिशा मिळाली. आगरकरांच्या वैचारिक प्रबोधनामुळे समाजातील विषमता नाहीशी होऊन स्त्री पुरूषात समानता स्थापीत झालेली दिसते.

**संदर्भ :**


1. सरदार गं. बा., आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, व्हीनस प्रकाशन, पुणे, 1975, पृ. 107
2. उपरोक्त, सरदार, आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ. 2
3. कुंभार नागोराव (संपा), गो. ग. आगरकर: विचार दर्शन, प्रबोधन प्रकाशन, लातूर, 1995, पृ. 41
4. प्रिं. गोपाळ गणेश आगरकर, राष्ट्रीय चरित्रमाला, पुणे, 1977, पृ. 31
5. उपरोक्त, सरदार ग. बा., आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ. 108
6. उपरोक्त, सरदार ग. बा., आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ. 83
7. फडके य दि., शोध बाळ गोपाळांचा, श्रीविद्या प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पुणे, 2000, पृ. 25
8. देशपांडे सुनंदा, गोपाळ गणेश आगरकर, विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1983, पृ. 89
9. सहस्त्रबुध्दे पु. ग., केसरीची त्रिमूर्ती, केसरी प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, 1974, पृ. 166
10. उपरोक्त, देशपांडे सुनंदा, गोपाळ गणेश आगरकर, पृ. 89
11. अळतेकर मा. दा., संपूर्ण आगरकर, भाग 2, मॉडर्न बुक डेपो, पुणे, 1947, पृ. 217
12. उपरोक्त, प्रिं. गो. ग. आगरकर, राष्ट्रीय चरित्रमाला, पृ. 32
13. गर्गे स. मा., गोपाळ गणेश आगरकर, नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली, आवृत्ती 4, 2004, पृ. 84
14. उपरोक्त, अळतेकर मा. दा., संपूर्ण आगरकर, भाग 2, पृ. 141
15. उपरोक्त, सरदार ग. बा., आगरकरांचा सामाजिक तत्वविचार, पृ. 109
16. उपरोक्त, देशपांडे सुनंदा, गोपाळ गणेश आगरकर, पृ. 44